# पत्रिका वाटत असताना वधू पित्याचा मृत्यू

## मेहकर येथे समृद्धी महामार्गावर कार अपघात | पत्नी व मुलगा किरकोळ जखमी



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि.21) –** ऐन पंधरा दिवसांवर मुलीच्या लग्न सोहळा असल्याने कुळदैवताला पत्रिका अर्पण करुन परत येत असलेल्या कुटूंबियाच्या कारचा अपघात झाला. यामध्ये वधूपित्याचा मृत्यू झाल्याने आनंदाचे वातावरणात दुखात बदलले. 20 जानेवारी रोजी मेहकर समृद्धी महामार्गावर हा कार अपघातात घडला. मनोज रमेशचंद्र जयस्वाल असे मृत्यूमुखी पडलेल्या वधूपित्याचे नाव आहे. ते अमरावती बस स्टॅन्ड येथील अंबिका हॉटेलचे संचालक होते. या अपघातात त्यांची पत्नी व मुलगा किरकोळ जखमी झाला. या घटनेमुळे जयस्वाल कुटुंबासह समाज बांधवांना मोठा धक्का बसला असून, अमरावतीच्या व्यवसायीक क्षेत्रात शोककळा पसरली आहे.

अंबिका हॉटेलचे संचालक मनोज रमेशचंद्र जयस्वाल हे मेहकर इथे कुलदेवीच्या मंदिरात मुलीच्या लग्नाची पत्रिका ठेवण्यासाठी गेल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. ते अमरावती वरून मेहकरसाठी पत्नी व मुलगा सोबत कारने समृद्धी महामार्गवरून जात होते. दरम्यान मेहकरला देवीच्या मंदिरात मुलीच्या लग्नाची पत्रिका ठेवल्यानंतर ते समृद्धी महामार्गाने अमरावतीसाठी निघाले होते.

यादरम्यान समृद्धी महामार्गावर गाडीचा टायर फुटल्याने झालेल्या अपघातात मनोज रमेशचंद्र जयस्वाल (52) यांचा जागेवरच मृत्यू झाले आहे. तर पत्नी व मुलगा जखमी झाले. जखमींना अकोला औषध उपचारासाठी रवाना करण्याची माहिती मिळाली आहे. अपघातात मनोज जयस्वाल यांचा मृत्यू झाल्याची माहिती शहरात पसरल्याबरोबरच त्यांच्या शहरातील व्यापारी वर्गात शोककळा पसरली.

मनोज जयस्वाल हे हसमुख आणि मनमिळावू स्वभावाचे होते. गेल्या अनेक वर्षांपासून अमरावती शहरातील मध्यवर्ती बसस्थानकाला लागूनच त्यांचे अंबिका लॉज व हॉटेल आहे. मंगळवारी बसस्थानक परिसरातील सर्व व्यापारी प्रतिष्ठाने बंद ठेवण्यात आली होती.

### आनंदावर विजरण

जयस्वाल यांच्या कुटुंबात चार भाऊ असून, त्यांचा परिवार मोठा आहे. जयस्वाल कुटुंबात बरेच वर्षानंतर लग्नासारखे मंगल कार्य होणार आहे. त्यामुळे संपूर्ण कुटुंबामध्ये उत्साहाचे वातावरण होते. मनोज जयस्वाल यांच्या मुलीचा लग्न सोहळा 7 फेब्रूवारी रोजी होणार आहे. घरात आनंदाचे वातावरण असताना या घटनेमूळे आनंदावर विरजन पडले. मंगळवारी दुपारी 2 वाजताच्या सुमारास मनोज जयस्वाल यांच्या मृतदेहाचे अकोला येथे शवविच्छेदन करण्यात आले. त्यानंतर अमरावती येथील मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले आहे.

# अंबानगरीत घडला इतिहास

## 401 तासाच्या विश्वविक्रमावर उमटविली मोहर

### आयोजकांकडून जल्लोष





**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि.21)–** स्थानिक अभियंता भवन येथे सुरू असलेल्या 4 जानेवारी पासून सुरु असलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाचा वर्ल्ड रेकॉर्ड(विश्वविक्रम) कार्यक्रमात मंगळवारी दुपारी 1 वाजता 401 तास पुर्ण होवून एक वर्ल्ड रेकॉर्ड तोडला, तर झाले असून यावेळी आयोजकांनी मोठा जल्लोष केला. यावेळी ढोल, ताशे वाजत गाजत पाहुण्यांचे स्वागत केले आहे.

अमरावती विदर्भाची सांस्कृतिक राजधानी असून या राजधानीत इतिहासात लिहिल्या जाणारी ऐतिहासिक कामगिरी करण्यात आली आहे. या कार्यक्रमाला वर्ल्ड रेकॉर्ड दिल्ली चे सीईओ पवन सोलंकी प्रमुख अतिथी होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून अमरावतीचे आमदार सुलभा खोडके उपस्थित होत्या. या कार्यक्रमाला नागपूर चे मनीष पाटील उपस्थित होते. समाजसेवक नानक नेभणांनी समाजसेवक, गोविंद कासट, बिल्डर सचिन वानखडे, अभिनंदन बँकेचे सुदर्शन जैन, पुरुषोत्तम मुंदडा, दिलीपराव लोखंडे, महात्मा फुले बँकेचे संचालक राजेंद्र आंन्डे, चंद्रकांत पोपट, राजा हाडोळे, गजू लोखंडे, अक्षय लोखंडे, प्रभाकरराव घाटोळ, स्वराध्या एंटरटेनमेंट चे संचालक दिनकर तायडे, संचालिका स्वामिनी तायडे, स्वराध्या इंटरटेनमेंट ची संपूर्ण टीम यावेळी उपस्थित होती.

मागील 18 दिवसापासून रात्रंदिवस न थांबता निरंतर हा कार्यक्रम सुरू होता. यावेळी भारतातील अनेक कलावंतांनी संगीताच्या माध्यमातून आपली कला सादर करून या ठिकाणी विविध गीते गाऊन जगातील श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. स्वराध्या एंटरटेनमेंट च्या संचालिका स्वामिनी तायडे यांनी प्रास्ताविक, संचालन ईशांत राजगुरे, आभार दीप्ती सहारे यांनी केले.

### नागपूर मध्ये झालेले सर्व रेकॉर्ड तोडले!

या आधी मी नागपूरला आतापर्यंत 13 वर्ल्ड रेकॉर्ड केले. सर्वात आधी नागपूरला 2008 मध्ये वर्ल्ड रेकॉर्ड केला. गुजरात मध्ये नरेंद्र मोदी चे 62 तासा चा रेकॉर्ड आम्ही तोडला. त्यानंतर वरूडला 72 तासाचा रेकॉर्ड तोडला.आम्ही नागपूरला 180 तासाचे रेकॉर्ड केला होता. त्यावेळी आमचा रेकॉर्ड कोणी तोडला नव्हता. परंतु आज अमरावती ने 401तासाचे रेकॉर्ड बनून आज आमचा रेकॉर्ड तोडला.अमरावतीच्या 401 तासाच्या वर्ल्ड चे ओपनिंग नितीन गडकरी यांनी केले. अमरावतीचे स्वराध्या एंटरटेनमेंटच्या टीम ने ते पूर्ण केले. त्यांचे मी खूप खूप धन्यवाद मानतो एव्हढा मोठा रेकॉर्ड त्यांनी करून दाखविला.

**–मनीष पाटील,नागपूर**

### अमरावतीकरांचा अभिमान वाटतो!

401 तासाचा हे वर्ल्ड रेकॉर्ड करणे फार कठीण होते ते आज अमरावतीकारांनी करून दाखविले या आधी वरुड, नागपूर, गुजरात ,येथे वर्ल्ड रेकॉर्ड झाले परंतु इतिहासात पहिल्यांदा 401 तासाचे वर्ल्ड रेकॉर्ड अमरावतीने पूर्ण केले एवढे मोठे रेकॉर्ड आतापर्यंत भारतातही कुणी केलेले नाही. ते आज अमरावतीने केले मला त्यांचा खूप अभिमान आहे व त्यांच्या स्वराध्या एंटरटेनमेंट च्या संपूर्ण टीमने अहो रात्र मेहनत घेऊन हे रेकॉर्ड पूर्ण करून दाखविले त्याचा आम्हाला अभिमान आहे.

**–पवन सोलंकी, सीईओ वर्ल्ड रेकॉर्ड दिल्ली**

### अपघातात अनोळखी व्यक्तीचा मृत्यू!

**अमरावती –** मोर्शीपासून अवघ्या 3 किलोमीटर अंतरावर असलेल्या भाईपूर बस थांब्याजवळ एका अनोळखी व्यक्तीचा भीषण अपघात झाला. ही घटना 20 जानेवारी रोजी सकाळी उघडकीस आली. या अपघाताच्या माहितीवरून तानाजी युवा बहुउद्देशीय संघटना महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष राहुल दिलीपराव पंडागरे यांनी रवि परतेती व त्यांच्या मित्रपरिवारासोबत घटनास्थळ गाठले आणि तातडीने जखमींना मदतकार्य सुरू केले.

# रेट्याखेडा येथील पोलिस पाटिल पदावरून बडतर्फ

## वृध्द महिलेवर अमानवीय अत्याचार प्रकरण

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि.21)–** रेट्याखेडा येथे एका 77 वर्षीय वृध्द महिलेवर अमानवीय अत्याचार केल्याचे प्रकरण उघडकीस आले होते. या प्रकरणात काही ग्रामस्थासह स्थानिक पोलिस पाटील बापु झापु जामुनकर हा देखील सहभागी असल्यामुळे त्याला पदावरून बडतर्फ करण्यात आले आहे. धारणी च्या सहायक जिलाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रियवंदा महांदळकर यांनी हे आदेश दिले आहे.

**कर्तव्यामध्ये हयगय,कसुर केल्याचे सिध्द**

पोलीस पाटील बाबु झापु जामुनकर याने गंभीर स्वरूपाचा गुन्हा घडवून आणून पोलीस पाटील पदाची प्रतिष्ठा मलीन केली आहे. महाराष्ट्र ग्राम पोलीस पाटील अधिनियम-1967 च्या कलम 9 (च) अन्वये, एखादा पोलीस पाटील त्याच्या कर्तव्याचे उल्लंघन करतो असे आढळल्यास



त्याला बडतर्फ करण्याची तरतूद नमुद केलेली आहे. त्यामुळे बाबु झापु जामुनकर याने केलेले गैरकृत्य हे पोलीस पाटील पदास न शोभणारे व अत्यंत गंभीर स्वरुपाचे आहे.तसेच प्रकरणात जामुनकर याने महाराष्ट्र ग्राम पोलीस पाटील अधिनियम 1967 मधील पोलीस पाटील कर्तव्यामध्ये हयगय,कसुर केल्याचे सिध्द होत आहे. त्यामुळे सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, धारणी यांनी महाराष्ट्र ग्राम पोलीस पाटील अधिनियम-1967 अन्वये कलम 9 (च) नुसार बाबु झापु जामुनकर याला पोलीस पाटील या पदावरून बडतर्फ केले आहे.

# चारचाकी वाहनाची दुचाकीला जबर धडक

### दुचाकी चालक गंभीर जखमी





**महासागर प्रतिनिधी**
**वरुड (दि.21)–** वरुड ते अमरावती रस्त्यावरील लाखारा फाट्यावर किया कंपनीच्या चारचाकी वाहनाने मागुन दुचाकीला पाठीमागून जबर धडक दिल्याने दुचाकी चालक गंभीर जखमी झाला. ही घटना मंगळवार (दि.21) ला सकाळी 9 वाजता घडली. दिनेश तांबुसकर (रा. जामगांव खडका) असे अपघातात गंभीर जखमी झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. जखमीला तातडीने जामगांव येथील सामाजिक कार्यकर्ते अखील माकोडे, मनिष तांबुसकर व प्रशांत भुजाडे यांनी अमरावती येथे पंजाबराव देशमुख रुग्णालयात दाखल केले. मात्र चारचाकी चालक घटनेवेळी फरार झाला असून पोलीसांनी त्याचा शोध घेवून त्यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी गंभीर जखमीच्या नातेवाईकांनी केली आहे. अपघातानंतर चारचाकी वाहनही पलटी झाले. वाहनातील सर्व व्यक्ती अपघातानंतर फरार झाले असल्याची माहिती आहे. जखमीला नागूपरला हलविण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे. बेनोडा पोलीस याप्रकरणी आपली पुढील कारवाई करित आहे.

### मिनी सरस प्रदर्शनी दि. 24 ते 28 जानेवारीपर्यंत

**अमरावती–** ग्रामीण भागातील स्वयं सहाय्यता समूहातील महिलांचे जीवनमान उंचावणे, त्यांचे सबलीकरण करणे व उपजीविका आधारित उपक्रम राबविणे यासाठी उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान राज्यामध्ये राबविण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून स्वयं सहाय्यता समूहाने उत्पादित केलेल्या मालाला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी दि. 24 ते 28 जानेवारी 2025 दरम्यान विक्री प्रदर्शनीचे आयोजन मुख्य बस स्थानक समोर, सायन्स स्कोर मैदान, अमरावती येथे आयोजित करण्यात येत आहे.

# नवनियुक्त शिवसेना जिल्हाप्रमुख पराग गुडधे यांचे जंगी स्वागत



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,(दि.21)–** उबाठा शिवसेनेचे नवनियुक्त जिल्हाप्रमुख पराग गुडधे यांचे अमरावतीमध्ये आगमन होताच, त्यांचे समर्थक शिवसैनिकांनी जंगी स्वागत केले.दुपारी 2 वाजता राजापेठ येथील पराग गुडधे यांच्या कार्यालयासमोर हा स्वागत समारोह पार पडला.

यावेळी महिलांनी औक्षवण गुडधे यांचे स्वागत केले. त्यानंतर फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. ढोल ताश्यांच्या गजरात विजय घोषणा देण्यात आल्या. यावेळी मनोज कडू, नरेंद्र पडोळे, शहर प्रमुख संजय शेटे, तालुका प्रमुख कपिल देशमुख, प्रमोद धनोकार, मुन्ना शर्मा, उपमहानगर प्रमुख विजय ठाकरे, सुनिल राऊत, प्रवीण अळसपुरे, प्रकाश मारोटकर, उपजिल्हाप्रमुख राजेश पांडे, तालुका प्रमुख प्रमोद कोहळे, तालुका प्रमुख धामणगाव निलेश मुंदाणे, शहर प्रमुख नरेंद्र देउळकर, शहर प्रमुख गजानन यादव , सहकार सेना तालुका प्रमुख बंडू यादव, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष दत्ता ढोमणे, प्रफुल्ल भोजने, राजू अकोटकर, विपीन ढोंगे, श्रीकृष्ण मते, अकणुष पटले, महिला आघाडी सहसंपर्क प्रमुख प्रतिभा बोपशेट्टी, जिल्हाप्रमुख मनिष टेंभरे, महानगर प्रमुख लक्ष्मी शर्मा, शहर प्रमुख राजश्री जढाले, मोहन मुंदाने , विनोद गावंडे, राजू पडोळे, सुभाष पडोळे, बाळू पडोळे, विजय केशे, ऋषिकेश सगणे, विनोद काळे, शैलेश पांडे, शुभम सपाटे, अमोल पडोळे, दिलीप बोंडे सह अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### अंबादेवीचे घेतले दर्शन

गुडधे यांनी राजापेठ येथून पायदळ जात अंबादेवी, एकविरा देवीचे दर्शन करत, आरती केली. यावेळी जिल्हाभरातील शिवसैनिक मोठ्या संख्येने अमरावतीत दाखल झाले होते.

# फक्त उमेदवारावर कारवाई, स्टार प्रचारकावर का नाही?

## तोंड दाबून बुक्याचा मार नको– अभिजीत अडसूल





**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,(दि.21)–** दर्यापुर विधानसभेत मित्रपक्षाने उमेदवार दिल्यामुळे आम्हाला पराभूत व्हावे लागले. त्या उमेदवारावर कारवाई झाली मात्र त्याचा प्रचार करणाऱ्या स्टार प्रचारकांवर कारवाई करता आली नाही. त्यामुळे जिल्ह्यात व महायुतीमध्ये चुकीचा मॅसेज गेला. नुकत्याच झालेल्या निवडणुकीमध्ये शिवसैनिकांना मुठभर जागा दिली, त्यातही तोंड दाबून बुक्याचा मार सहन करावा लागला. जे माझ्या सोबत झाले ते माझ्या कार्यकर्त्यांसोबत होणार नाही. अमरावती जिल्ह्यातील शिवसैनिकांची मागणी लक्षात घेता आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणुक स्वतंत्र लढावी असा प्रस्ताव उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यापर्यंत पोहोचवू अशी ग्वाही माजी आमदार कॅप्टन अभिजीत अडसूळ यांनी दिली.

शिवसेना शिंदे गटाचा पदाधिकारी व कार्यकर्ता मेळावा मंगळवार 21 जानेवारी रोजी महेंद्र लॉन येथे आयोजित करण्यात आला. यावेळी अडसूळ कार्यकर्त्यांना संबोधित करित होते. यावेळी मंचावर निशांत हरणे, माया देशमुख, अप्पु तिडके, राम पाटील, सुनील केने, शिवसेनेचे माजी नगरसेवक मधुकरराव शिंदे, शिवसेनेचे माजी नगरसेवक राजेंद्र दारोकार उपस्थित होते.

पुढे बोलतांना अभिजीत अडसूल म्हणाले की, राजकारण जो पर्यत पाया रोवत नाही, तोपर्यंत समाजकार्य सुध्दा करता येणार नाही. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका ह्या स्वतंर्त्य लढविण्यात याव्या अशी मागणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना करण्यात येईल. एकत्रित लढल्याने फायदा होणार नाही, आम्ही आधीच धोका खाल्ला आहे. पुन्हा तोंड दाबुन बुक्याचा मार किती वेळ सहन करणार.

### महायुतीमधील वातावरणाकरिता महायुतीच जबाबदार

महायुतीमध्ये झालेल्या प्रकाराने शिवसैनिकांमध्ये भितीचे वातावरण झाले. महायुतीमधील वातावरण खराब होण्यासाठी सुध्दा महायुतीच जबाबदार असल्याचे ते म्हणाले. जर योग्य वेळीच कारवाई करण्यात आली असती तर निश्चितच आमचा विजय असता आणि महायुतीमध्ये चांगला मॅसेज गेला असता. मात्र, त्यांना तसे करायचे नव्हते. आता मात्र आम्ही आमच्या नेत्याला विचार करायला लावू असेही अडसूळ म्हणाले.

### अनेकांचा पक्ष प्रवेश

यावेळी अभिजीत अडसूल यांच्या हस्ते विविध पक्षातून येणाऱ्या पदाधिकाऱ्यांचा पक्ष प्रवेश करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन लोनपांडे तर आभार प्रदर्शन राम पाटील व सुनील केने यांनी केले.

# कही खुशी, कही गम, सावंतचा पुतळा जाळला



एकीकडे नवनियुक्त पदाधिकाऱ्यांकडून जल्लोष साजरा केला जात असताना दुसरीकडे काही शिवसैनिकांनी आपल्याच नेत्याचा पुतळा जाळून संताप व्यक्त केला. या शिवसैनिकांचे म्हणणे होते की, शिवसेना (उबाठा) नेते खा. अरविंद सावंत जेव्हा पासून अमरावती जिल्ह्यात संपर्क प्रमुख झालेत तेव्हा पासून शिवसेनेची अमरावती जिल्ह्यात वाताहत झाली. मागील विधानसभा निवडणूकीत शिवसेनेशी गद्दारी करणाऱ्या तसेच निष्क्रिय अशा लोकांना पदांची खिरापत वाटून कट्टर अशा निष्ठावान शिवसैनिकांच्या मनात तीव्र असंतोष निर्माण केला आहे. मंगळवारी (दि.21) सायंकाळी बडनेरा येथील आठवडी बाजार नवीवस्ती स्थित छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्या समोर बडनेरा शहर शिवसेनेच्या वतीने खा.अरविंद सावंत यांचा पुतळा जाळून जाहीर निषेध नोंदवित नारेबाजी करण्यात आली. यावेळी सचीन कैथवास, उमेश वाठ, प्रकाश बांते, रवी अंबाडकर, राजू अक्कलवार, शेखर घिमे, संदीप इंगोले, निलेश सावळे, संजय खांडेकर, स्वप्नील दारोकार, सागर पंदे, सुरेश देव्हारे, आनंद जोशी, सनी कैथवास, आकाश कैथवास, रवी कैथवास, कैलाश कैथवास, सतीश कुरवाळे, शैलेश देशमुख, रवी तरारे उपस्थित होते.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# ग्रामपंचायतींवर महिला सरपंचांच्या पतींचेच राज्य

## कामकाजात ढवळाढवळ, शासन निर्णयाची पायमल्ली




**संतोष भालेराव**
**अचलपूर, (दि.21)**– तालुक्यातील महिला सरपंच असलेल्या ग्रामपंचायतींमध्ये त्यांच्या पतींचेच राज्य असल्याचे चित्र दिसून येत आहे. महिला सरपंचांच्या पतींची ग्रामपंचायतच्या कामकाजात ढवळाढवळ वाढली असून त्यांच्याकडून सर्वसामान्य नागरिकांना विविध कामांसाठी वेठीस ठरले जात आहे. परिणामी नियमबाह्य पद्धतीने ग्रामपंचायतीच्या कामकाजात हस्तक्षेप करणाऱ्या या महिला सरपंचांच्या नवरोबांना आवर घालण्याची मागणी सर्वसामान्य नागरिकांकडून करण्यात येत आहे.

अचलपूर पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या अनेक गावांच्या ग्रामपंचायती व गट ग्रामपंचायतमध्ये सरपंच पदावर महिला विराजमान आहेत. या महिला थेट जनतेमधून सरपंच पदी निवडून आल्या आहेत. पंचायतींच्या कामकाजात महिलांचा सहभाग वाढावा, त्यांच्या माध्यमातून पारदर्शकपणे गावातील विकास कामे पूर्ण व्हावीत, या उद्देशाने सरकारकडून ग्रामपंचायतमध्ये महिलांसाठी आरक्षण देण्यात आले आहे. त्यातून अनेक महिलांना सरपंच पदावर काम करण्याची संधी मिळाली आहे. महिला सरपंच व सदस्यांचे पतीदेव ग्रामपंचायतच्या कामकाजात हस्तक्षेप करून पत्नींच्या अधिकारांचा गैरवापर करण्याचे प्रकार घडतात. ते टाळण्यासाठी शासनाने परिपत्रक काढले आहे. त्यानुसार महिला सरपंच किंवा सदस्यांच्या पतींनी ग्रामपंचायत कार्यालयात येऊन कारभारात ढवळाढवळ करण्यास मज्जाव करण्यात आलेला आहे. याबाबतचा आदेश शासनाने 17 जुलै 2007 रोजी निर्गमित केलेला आहे. मात्र शासनाचे हे आदेश सर्रास पायदळी तुडविले जात आहेत. बहुतांश ग्रामपंचायतमध्ये महिला सरपंच किंवा सदस्या ऐवजी त्यांचे पतीच ग्रामपंचायतचा कारभार हाकतात असे चित्र दिसून येते.

महिला सरपंचांऐवजी त्यांचे पतीच ग्रामपंचायतमध्ये येऊन अधिकार गाजवत असल्याने सर्वसामान्य नागरिक मात्र वेठीस धरल्या जात आहे. हे नवरोबा सर्वसामान्य नागरिकांची अडवणूक करतात, त्यामागे त्यांचा आर्थिक उद्देश असतो असा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. एवढेच नाही तर गावाच्या विकासासाठी असलेल्या योजनांमध्येही वाईट उद्देशाने हे पतीदेव हस्तक्षेप करत असल्याने विकास कामेही अनेक ठिकाणी रखडली आहेत.

ग्रामपंचायतअंतर्गत घेतल्या जाणाऱ्या ग्रामसभेत शासनाच्या परिपत्रकांचे वाचन करून तसा ठराव पारित केला जात असतो. मात्र ज्या ग्रामपंचायतमध्ये महिला सरपंच आहेत. अशा बहुतांश ग्रामपंचायत शमध्ये महिला सरपंचांच्या पतींना कामकाजात मज्जाव करण्यासंदर्भातील शासन परिपत्रकाचे वाचन करण्यात आलेले नाही. तसा ठरावही पारित केला गेला नाही. संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांकडूनही ही गंभीर बाब दुर्लक्षित केली जात आहे. शासनाच्या आदेशाची गांभीर्याने अंमलबजावणी व्हावी याकरिता आता वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष घालून महिला सरपंचांच्या पतींचा ग्रामपंचायतमधील गैर कायदेशीर हस्तक्षेप थांबवावा अशी मागणी सर्वसामान्य ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# प्रलंबित मागण्यांसाठी आरोग्य मित्र पुकारणार बेमुदत संप

### आयुष्यमान व जनआरोग्य योजना प्रभावित होणार

**महासागर प्रतिनिधी**
**चांदुर बाजार,(दि.21)**– महाराष्ट्र सरकारची महात्मा फुले जन आरोग्य योजना व केंद्र सरकारची प्रधानमंत्री जन आरोग्य योजना त्या अंतर्गत कार्यरत असणाऱ्या आरोग्य मित्रांच्या प्रलंबित मागण्यांकडे दुर्लक्ष करण्याचे धोरण सरकारने अवलंबिले असल्याने या आरोग्य मित्रांमध्ये शासनाप्रती असंतोष निर्माण झाला आहे. राज्यातील आरोग्य मित्रांनी मागण्या पूर्ण व्हाव्या यासाठी बेमुदत संपावर जाण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्यासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या या योजना प्रभावित होऊ शकतात.

आरोग्य मित्र संघटनेचे अध्यक्ष डॉ. डी. एल. कराड यासंदर्भात माहिती देताना सांगितले की, राज्यातील आरोग्य मित्रांनी प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी 12 फेब्रुवारी पर्यंतची मुदत दिली आहे. त्यानंतर संपूर्ण राज्यातील आरोग्यमित्र बेमुदत संपाचे हत्यार उपसणार आहे. आरोग्य मित्रांनी विविध मागण्या सरकारकडे केल्या असून त्याचा सातत्याने पाठपुरावाही करण्यात आला. मात्र आरोग्य मित्रांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करण्याचे धोरण सरकारने अवलंबिले आहे.

आरोग्य मित्रांच्या प्रलंबित मागण्यांमध्ये किमान वेतन कायद्यानुसार 26 हजार रुपये विशेष अलाउन्स व महागाई भत्ता मिळावा, वेतनात दरवर्षी दहा टक्के वाढ व्हावी, आरोग्य मित्रांना पेट्रोल भत्ता देण्यात यावा, कायदेशीर रजा मिळावी, आरोग्य मित्रांच्या बदलीचे धोरण रद्द करण्यात यावे, आरोग्य मित्र रमेश पंडित बसणे आणि गणेश अशोक शिंदे यांना पुन्हा कामावर रुजू करावे, नोकरीला पाच वर्ष पाच वर्ष होऊनही आरोग्य मित्रांना उपदान देण्यात आलेले नाही, सहाय्य संस्थेने ही रक्कम त्वरित अदा करावी आदी मागण्यांचा समावेश आहे.



# वर्ल्ड रेकॉर्ड उपक्रमात आनंद विद्यालयातील विद्यार्थ्यांचा सहभाग

**विविध नृत्यांचे केले सादरीकरण**

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,(दि.21)** – स्वराध्या एंटरटेनमेंट आणि मनीष फाउंडेशन च्या वतीने अभियंता भवन येथे विश्वविक्रम प्रस्थापित करण्यासाठी सलग 18 दिवस व 18 रात्र असे 401 तास विविध कला प्रकारांचे सादरीकरण करण्यात येत आहे. या उपक्रमात आनंद प्राथमिक मराठी शाळा व माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी नुकताच सहभाग घेतला व विविध गाण्यांवर नृत्यांचे सादरीकरण करून उपस्थितांची वाहवा मिळविली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी आनंद शाळेतील विद्यार्थ्यांनी 'ओंजळीत भिमाच्या चंद्र सूर्य मावले...', 'मानवतेशी वैऱ्या वाणी खेळला...' या गीतांवर नृत्य सादर केले. तसेच शाळेतील मुलींनी महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या जीवनातील शिक्षणाचे महत्त्व पटवून देणारा प्रसंग नाटिका व नृत्यातून साकारला. आनंद प्राथमिक मराठी शाळेच्या मुख्याध्यापिका प्रणिता रक्षित, मुख्याध्यापक रत्नराज संदीप रक्षित, हिरा रक्षित, वंदना मॅडम यांच्या मार्गदर्शनात शाळेतील विद्यार्थ्यांनी या उपक्रमात आपला सहभाग नोंदविला.

# नवनिर्माणासाठी जिद्द आणि प्रेरणा महत्त्वपूर्ण

## गणिततज्ञ आनंद कुमार यांचे प्रतिपादन | पोटे ग्रुपच्या 'टेकलॉन्स 2025'चे उद्घाटन

### विविध स्पर्धांमध्ये दहा हजार विद्यार्थ्यांचा सहभाग

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि.21)**– कोणतीही नवीन कल्पना किंवा शोधा मागे प्रेरणादायी कथा दडलेली असते. ज्यांना समाज बदलवायचा आहे किंवा स्वत:चा ठसा उमटवायचा आहे, त्यांनी स्वत:साठी प्रेरणादायी व्यक्तिमत्व व कथा शोधणे आवश्यक आहे. नवनिर्माणासाठी आतून येणारी जिद्द आणि प्रेरणा महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन सुपर 30 प्रोग्रामचे संस्थापक आणि प्रसिद्ध गणिततज्ञ आनंदकुमार यांनी केले.

पी आर पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप अंतर्गत विद्यार्थ्यांच्या विविध समूहांनी आयोजित केलेल्या टेक्नो 2025 या आंतरराष्ट्रीय महोत्सवाचे उद्घाटन आनंदकुमार यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. आनंद कुमार यांनी आपल्या



भाषणात पी आर पोटे पाटील ग्रुपच्या शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य व योगदानाची प्रशंसा केली. या कार्यक्रमातून आनंदकुमार यांनी दहा हजार विद्यार्थ्यांची संवाद साधला. मोठे महाविद्यालयाच्या स्वामी विवेकानंद ऑडिटोरियममध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी मंचावर पी आर पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपचे अध्यक्ष माजी मंत्री प्रवीण पोटे पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष श्रेयश पोटे पाटील, संचालक डॉ. पीएम खोडके, प्राचार्य डॉ. पी. एम. जावंदिया प्राचार्य डॉ. एस.सी. एल. भुतडा, प्राचार्य डॉ. अनिल ठाकरे, प्राचार्य सुजाण गवळी, प्राचार्य डॉ. ए. बी. देशमुख, डॉ. एस. डब्ल्यू. देशमुख, उपप्राचार्य डॉ. मो. सुहेर, डॉ. एस. के. नंदा, डॉ. पल्लवी मानकर, डॉ. विशाल पडोळे आदी मंचावर उपस्थित होते. टेक लॉस 2025 च्या उद्घाटनानंतर हॅकथॉन, कोडेथॉन, एक्सेलरेट, स्टार्टअप कॉम्पिटिशन प्रोजेक्ट, मॉडेल एक्झिबिशन, कॅडवॉर, टॅलेंट बॅटल, लॅ गेमिंग, सर्किट मेनिया, बिझनेस प्लॅन, पेपर आणि पोस्टर प्रेझेंटेशन, एग्रीकल्चर एक्जीबिशन, स्ट्रक्ट फेस्ट, डिझाईन कॉम्पिटिशन, डिबेट फेस ऑफ आणि इतर ऑन स्पॉट इव्हेंटचे उद्घाटन सुद्धा करण्यात आले. यावर्षी हे हॅकॅथॉन, कोडेथॉन या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे. बुद्धीला चालना देणाऱ्या या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना पीआर पोटे पाटील गरुपचे अध्यक्ष प्रवीण पोटे म्हणाली की, ह सुपर थर्टी प्रोग्राम चे संस्थापक व गणित तज्ञ आनंद कुमार यांच्या संकल्पना अत्यंत प्रेरणादायी आहेत. त्यांनी गरीब आणि वंचित घटकातील विद्यार्थ्यांना उच्च प्रतीचे शिक्षण दिले आहे. त्यांच्या प्रयत्नातून आज पर्यंत 510 विद्यार्थी आयएएस, आयपीएस, आय आर एस बनले असून देशातील नामांकित कंपन्यांमध्ये अनेक जण महत्त्वाच्या पदांवर काम करीत आहेत. निश्चितच कौतुकाची बाब आहे. तुमच्यात नैसर्गिक गुण नसेल तरीही तुम्ही एखाद्या विशिष्ट क्षेत्रात मनापासून परिश्रम घेतले तर यशापासून तुम्हाला कोणीही रोखू शकत नाही, असेही प्रवीण पोटे पाटील यावेळी म्हणाले.



# सिद्धार्थ वाचनालयात 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रम

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी,(दि.21)** – विहीगाव येथील सिद्धार्थ सार्वजनिक वाचनालयात महाराष्ट्र शासनाचा वाचन संकल्प कार्यक्रम वाचनालयामध्ये नुकताच पार पडला.

वाचन कौशल्य ही एक कला असून वाचनातूनच त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्व सिद्ध होते व विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेकरिता विविध ग्रंथांच्या वाचनासोबतच भारतीय संविधानाचे वाचन करणे अत्यंत आवश्यक आहे, असे वाचनालयाचे संचालक अनंता मोहोड यांनी याप्रसंगी सांगितले. शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाद्वारे राबविण्यात येणारा वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा उपक्रम सिद्धार्थ सार्वजनिक वाचनालयात विहिगाव येथे राबविण्यात आला. यावेळी ग्रंथप्रदर्शनी, सामूहिक वाचन यासह विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सिद्धार्थ सार्वजनिक वाचनालया या उपक्रमाचे औचित्य साधून वाचन पंधरवाढा साजरा करण्यात आला. यावेळी वाचन कौशल्य, ग्रंथप्रदर्शनी, वाचकांचे सामुहिक वाचन आयोजीत करण्यात आले होत शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाद्वारे राबविण्यात येणारा वाचन संकल्प महाराष्ट्राचा% उपक्रमाला संस्थापक अध्यक्ष समाजभूषण मधुकरराव अभ्यंकर, वाचनालयाचे अध्यक्ष क्षितिज अभ्यंकर, उपाध्यक्ष गजानन वानखडे, सचिव प्रा, शुभांगी अभ्यंकर व सर्व पदाधिकारी यांनी शुभेच्छा दिल्या.उपक्रम यशस्वी करण्यासाठी शासनाचे ग्रंथपाल सचिन मोहोड,शिपाई मोहन माहुलकर यांनी परिश्रम घेतले.

# नवोपक्रम स्पर्धेत डॉ. माकोडे व सुधीर केने अव्वल

### जिल्हास्तरीय स्पर्धेचा निकाल जाहीर





**महासागर प्रतिनिधी**
**चांदुर रेल्वे, (दि.21)**– जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेद्वारे आयोजित करण्यात आलेल्या नवोपक्रम स्पर्धेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. या स्पर्धेत प्राथमिक शिक्षक गटातून डॉक्टर अनिल माकोडे तर माध्यमिक शिक्षक गटातून सुधीर केने यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला.

शिक्षकांमध्ये नाविन्यपूर्ण अध्ययन, अध्यापनाला चालना मिळावी व त्याद्वारे विद्यार्थ्यांना शिकविण्याची पद्धत अधिक सुलभ व्हावी, या उद्देशाने दरवर्षी नवोपक्रम स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या संयुक्त विद्यमाने पाच गटात ही स्पर्धा घेण्यात आली. पूर्व प्राथमिक गटात दहिगाव खुर्द येथील अंगणवाडी केंद्राच्या चैताली सावरकर यांनी प्रथम तर बऱ्हाणपूर अंगणवाडी केंद्राच्या कोमल ढगे यांनी द्वितीय क्रमांक प्राप्त केला. प्राथमिक शिक्षक गटात सालेपूरच्या जिल्हा परिषद शाळेतील डॉ. अनिल माकोडे हे प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरले. शिरपूर जिल्हा परिषद शाळेतील वर्षा सूर्यवंशी यांनी द्वितीय, मल्हारा जिल्हा परिषद शाळेतील बबलू कराळे यांनी तृतीय, सालणापूर जिल्हा परिषद शाळेतील विनोद राठोड यांनी चतुर्थ तर आडगावच्या जिल्हा परिषद शाळेतील कांचन खाडे यांनी पाचवा क्रमांक प्राप्त केला. अमरावतीच्या जिल्हा परिषद कन्या हायस्कूलचे वीरेंद्र ब्राह्मण व बऱ्हाणपूर शाळेतील डॉ. निलेश इंगोले यांना उत्तेजनार्थ पुरस्कार जाहीर करण्यात आले. माध्यमिक गटात तुकडोजी महाराज विद्यालयाचे सुधीर केने हे प्रथम पुरस्काराचे मानकरी ठरले. वरुड च्या जनता हायस्कूलचे अतुल पडोळे यांनी द्वितीय, टोम्पे महाविद्यालयाचे प्रणित देशमुख यांनी तृतीय, चांदु रेल्वेच्या मनालाल गुप्ता विद्यालयातील स्वप्नाली चौखंडे यांनी चतुर्थ तर कांडलीच्या रामकृष्ण विद्यालयातील विनायक ताथोड यांनी पाचवा क्रमांक प्राप्त केला. कारंजाच्या पंचशील विद्यालयातील शुभांगी पापळकर आणि उत्तमसराच्या माध्यमिक विद्यालयातील शितल भोपाळे यांना उत्तेजनार्थ पुरस्कार जाहीर करण्यात आले.

या जिल्हास्तरीय स्पर्धेत यशस्वी ठरलेल्या सर्व स्पर्धकांचे प्राचार्य मिलिंद कुबडे, ज्येष्ठ अधिव्याख्याता प्रेमला खरटमोल, स्पर्धा समन्वयक डॉ. विजय शिंदे, पवन मानकर, डॉ. राम सोनारे, डॉ. विकास गावंडे, डॉ. दीपक चांदुरे यांनी अभिनंदन केले आहे.

# संताजी सेनेच्या तालुका अध्यक्षपदी विनोद अंबरते



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. 21)**– तेली समाजाच्या उत्थानासाठी महाराष्ट्रात कार्यरत असलेल्या संताजी सेना बहुउद्देशीय संस्थेच्या भातकुली तालुका अध्यक्षपदी विनोद अंबरते यांची निवड करण्यात आली आहे.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अरुण गासे, सचिव जयंत मुळे, संघटक किशोर वाघ, कार्याध्यक्ष विजय जयसिंगपूरे, सहसचिव आशिष खोडके यांनी विनोद अंबरते यांची तालुका अध्यक्षपदावर निवड केली. बडनेराचे आमदार रवी राणा यांचे खंदे समर्थक व तेली समाजातील धडाडीचे कार्यकर्ते अशी विनोद अंबरते यांची ओळख आहे. तालुका अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# डस्टबिन न ठेवणाऱ्या तीन दुकानांना दंड

### महापालिकेची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,(दि.21)** – डस्टबिन न ठेवणारे आणि प्लॉस्टीकच्या पन्नीचा वापर करणार्या दुकानांची तपासणी मोहिम महापालिकेकडून सुरु आहे. 20 जानेवारी रोजी महापालिका पथकाने शेगाव नाका ते पंचवटी परिसरात प्लास्टिक जप्ती व डस्टबिनबाबत मोहिम राबवून तीन दुकानांवर दंडात्मक कारवाई केली.




मनपा आयुक्त, अतिरिक्त आयुक्त व वैद्यकीय अधिकारी डॉ.अजय जाधव यांच्या निर्देशानुसार 20 जानेवारी रोजी उत्तर झोन क्रमांक 1 अंतर्गत येणार्या शेगाव नाक ते पंचवटी परिसरात प्लास्टिक जप्ती व डस्टबिनबाबत मोहिम राबविण्यात आली. यामध्ये महापालिकेच्या चमुने एकुण 28 आस्थापनाधारक, किरकोळ विक्रेता यांच्या आस्थापनाची तपासणी केली. या तपासणीदरम्यान आस्थापनामध्ये कापडी अथवा कागदी बॅग किंवा 75 मायक्रोन पेक्षा जास्त जाडीचे प्लॅस्टिक वापर करतांना आढळून आले. सदर किरकोळ विक्रेत्यांकडुन प्लास्टिक जप्ती करण्यात आली. तसेच 3 आस्थापनामध्ये डस्टबिन न आढळून आल्याने आस्थापना निखील चांदेकर यांना 1000 रुपये, चांदेकर बेकरी यांना 1000 रुपये, मोहरे फुल भंडार यांना 500 रुपये दंड व प्लास्टिक पिशव्या आढळुन आल्याने आस्थापना कॉर्नर वडापाव, अंकुश पान सेन्टर यांना प्रत्येकी पाच हजार रुपये दंड असे एकूण 12 हजार 500 रूपये इतका दंड वसूल करण्यात आला व 3 किलो प्लॅस्टिक जप्त करण्यात आले. सदर मोहीममध्ये जेष्ठ स्वास्थ निरीक्षक राजु ढिक्याव, अमरावती शहर समन्वयक डॉ.श्वेता बोके, प्लॅस्टिक पथक प्रमुख नोडल अधिकारी विकी जेधे, विनोद टांक, ए.एम सैय्यद, इमरान खान, अकिब शेख, प्रविण उसरे, बिटप्युन ढेणवाल, तुंडलायत व सफाई कर्मचारी उपस्थित होते.

# अंजनगाव बारी-कोंडेश्वर मार्गाची प्रचंड दुर्दशा

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव बारी,(दि.21)**– अंजनगाव बारी ते तीर्थक्षेत्र कोंडेश्वर या तीन किलोमीटर लांबीच्या रस्त्याची सध्या प्रचंड दुर्दशा झाली आहे. रस्त्यावर सर्वत्र खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे. खड्ड्यांमधून वाट काढताना वाहन चालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. रस्त्याच्या दुरुस्तीसाठी नागरिकांकडून वारंवार मागणी करण्यात आल्यानंतरही संबंधित विभागाकडून त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत असल्याने नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. महाशिवरात्रीपूर्वी या रस्त्याचे नूतनीकरण करण्यात यावे, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात आली आहे.

अंजनगाव बारी-कोंडेश्वर हा वर्दळीचा मार्ग आहे. अंजनगाव व परिसरातील अनेक शिवभक्त या मार्गाने दर्शनासाठी कोंडेश्वरला जातात. या मार्गावर अनेक शेतकऱ्यांच्या शेतजमिनी असून काहींचे व्यवसाय देखील आहेत. त्यामुळे या मार्गावर सतत रहदारी असते. मात्र गेल्या काही वर्षात या रस्त्याची दुरुस्तीच करण्यात आलेली नाही. परिणामी मार्गावर ठिकठिकाणी खड्डे पडल्याने रस्त्याची चाळण झाली आहे. या रस्त्यावरून वाहने चालविताना वाहन चालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. सोबतच अपघातांचे प्रमाणही वाढले आहे.

उल्लेखनीय बाब अशी की, कोंडेश्वर संस्थानला तीर्थक्षेत्र विकास निधी म्हणून 25 कोटी रुपये उपलब्ध झाले असून या रकमेतून मंदिर परिसरातील विकास कामे प्रगतीपथावर आहेत. मोठे सभागृह, पार्किंग व्यवस्था,



दुकाने, तलाव सौंदर्यीकरण आधी कामे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून केली जात आहेत. दुसरीकडे बांधकाम विभाग मात्र अंजनगाव बारी मार्गाच्या दुरुस्तीकडे लक्ष द्यायला तयार नाही. पंधरा वर्षांपूर्वी या मार्गाचे निर्माण करण्यात आले होते. त्यानंतर साधी दुरुस्ती ही करण्यात आली नाही. परिणामी आता हा रस्ता पूर्णत: दुर्दशाग्रस्त झाला आहे. या मार्गावर प्राथमिक आरोग्य केंद्र, संकट मोचन हनुमान मंदिर, राणा माता मंदिर, दत्तप्रभू टेकडी मंदिर, माता मंदिर, गैभीशहा बाबा दर्गा, संत खटेश्वर महाराज मंदिर, गुणवंत बाबा मंदिर ही ठिकाणे सुद्धा आहेत.

> रस्त्यावरील खड्डयांमुळे या मार्गाने वाहन चालकांना जीव मुठीत धरूनच वाहने चालवावी लागतात. किरकोळ अपघातही घडले आहेत. भाविक भक्त व नागरिकांच्या सुविधेसाठी तात्काळ या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी पावले उचलली जाणे गरजेचे आहे.
> **सुनील पोकळे, नागरिक, अंजनगाव बारी**

दीड महिन्यानंतर महाशिवरात्रि उत्सव आहे. त्यानिमित्त कोंडेश्वर मंदिरात विविध कार्यक्रमांचे आठवडाभर आयोजन केले जाते. या कार्यक्रमाला अंजनगाव बारी व परिसरातील शेकडो लोक उपस्थित राहतात. त्यामुळे महाशिवरात्रीपूर्वी या रस्त्याचे नूतनीकरण करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

### सर्वत्र खड्डयांचे साम्राज्य, वाहनचालक त्रस्त

### महाशिवरात्रीपूर्वी नूतनीकरणाची मागणी

> तीर्थक्षेत्र विकास निधीतून कोंडेश्वर ते अंजनगाव बारी रस्त्याचे रुंदीकरण व सौंदर्यीकरण केले जाणे आवश्यक आहे. महाशिवरात्रीच्या काळात या मार्गावर मोठी रहदारी असते. त्यापूर्वी रस्त्याचे नूतनीकरण होणे अपेक्षित आहे. संबंधित जनप्रतिनिधी व बांधकाम विभागाने याकडे लक्ष द्यावे.
> **प्रमोद निचत, सामाजिक कार्यकर्ते, अंजनगाव बारी.**


## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की, मी व माझे पक्षकार नामे 'विकास विनायकराव ठाकरे' यांच्या वतीने सदरची जाहीर नोटिस देतो ती, येनेप्रमाणे,

मिळकतीचे वर्णन –मौजे हिरापुर, प्रगणे नांदगाव पेठ, सर्वे क्रं. 2/2, 3/2, 3/3, 16/4, प्लॉट क्रं. 99, ता. आणि जिल्हा. अमरावती.

सदर मिळकत माझे पक्षकार 'विकास विनायकराव ठाकरे' यांच्या मालकीचे आहे. तदनंतर, त्यांनी PIRAMAL CAPITAL & HOUSING FINANCE LTD. येथे गृह कर्जाकरीता अर्ज केला असता वरील वर्णनाचे मूळ खरेदीखत दि. 09/04/2021 रोजीचे दस्त क्र. 2336 आणि दि. 29/05/2020 रोजीचे दस्त क्र. 1678 गहाळ झालेले आहे. तसेच वरील नमूद दस्त कोणाला सापडल्यास किवा कुठे गहान/राष्ट्रीयकृत/खाजगी//पतसंस्था/सहकारी/इतर बँक बोजा, सदर मालमतेवीषयी शासकीय–नीमशासकीय इतर भानगड, कोनाचा मालकी/वारस हक्क किवा इतर आक्षेप असल्यास खाली देलेल्या माझ्या मोबाइल क्रं. वर ही जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या 7 दिवसाच्या आत पुराव्यानीशी हरकत नोंदवावी तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही ही विनंती.

शिक्का

आपला
Advocate
रवींद्र र वाटाणे
स्नेहगंधा कॉलनी, अमरावती
मो. नं. 9823698745